गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक ३३ वा ● बुधवार १९ जून २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 33 | Date : 19/06/2024 blow Wednesday Page 4 Price 4

## सांगोल्याजवळ भरधाव मालमोटारीने धडक दिल्याने सहा महिला शेतमजुरांचा मृत्यू



**आमदार शहाजी पाटील यांनी सदर अपघाताबद्दल दु:ख व्यक्त करून मृताच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ५० हजार रुपयाची मदत तर जखमी महिलांना उपचारासाठी २५ हजार रुपये व्यक्तिगत मदत जाहीर केली आहे. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी संपर्क साधून मृताच्या नातेवाइकांना आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितल**

**सोलापूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

शेतात मजुरीचे काम आटोपून गावाकडे परत जाण्यासाठी एसटी बसची वाट पाहात रस्त्याच्या कडे थांबलेल्या महिला शेतमजुरांना भरधाव वेगातील १४ चाकी मालमोटारीची जोराची धडक बसून घडलेल्या भीषण अपघातात सहा महिला शेतमजुरांचा जागीच मृत्यू झाला. पंढरपूर-कराड रस्त्यावर सांगोला तालुक्यातील चिकमहूदजवळ मंगळवारी दुपारी साडेचारच्या सुमारास हा अपघात घडला.

या अपघातातील मृतांची नावे लगेचच समजू शकली नाहीत. जखमींमध्ये दोन महिलांचा समावेश आहे. या सर्व महिला शेतमजुरी करून घराच्या संसाराचा गाडा ओढत होत्या. नेहमीप्रमाणे सकाळी चिकमहूद येथील एका शेतकऱ्याच्या शेतात पीक पेरणीच्या कामासाठी गेल्या होत्या. दुपारी उशिरा शेतातील काम आटोपून आपल्या गावी कटफळ येथे परत जाण्यासाठी या महिला रस्त्याच्या कडेला एसटी बसची वाट पाहात थांबल्या होत्या. परंतु पंढरपूरहून भरधाव वेगाने जाणाऱ्या एका १४ चाकी मालमोटारीने सर्व महिलांना जोरात ठोकरले. चालकाचा ताबा सुटल्यामुळे मालमोटार महिलांमध्ये घुसली. या अपघातात काही महिला मालमोटारीच्या दोन्ही बाजूच्या चाकांखाली चिरडल्या. सहा महिलांचा जागीच मृत्यू झाला असून अन्य दोन महिला जखमी झाल्या असून त्यांना नजीकच्या रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

दरम्यान, अपघात घडताच जोराचा आवाज येऊन गोंधळ उडाला. स्थानिक तरूणांच्या जमावाने मदतकार्य हाती घेतले. मालमोटारचालकाला जागेवर पकडून पोलिसांच्या हवाली करण्यात आले. सांगोला पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक भीमराव खणदळे यांनी अपघातस्थळी भेट देऊन निरीक्षण नोंदविले.

## प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या १७ व्या हप्त्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वाराणसी येथून वितरण

### राज्यातील ९०.४८ लाख लाभार्थींना रु. १८४५.१७ कोटी वितरित होणार : कृषिमंत्री धनंजय मुंडे




**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या (एप्रिल २०२४ ते जुलै २०२४) १७ व्या हप्त्याचे वितरण आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वाराणसी, उत्तर प्रदेश येथून करण्यात आले.

देशातील शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्न मिळण्याकरीता केंद्र शासनाने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (PM KISAN) योजना सुरु केली आहे. या योजने अंतर्गत पात्र शेतकरी कुटुंबीयास रु. २०००/- प्रती हप्ता याप्रमाणे तीन समान हप्त्यात रू. ६०००/- प्रती वर्षी लाभ दिला जातो.केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार प्रतिवर्षी पुढील वेळापत्रकानुसार पात्र शेतकरी कुटुंबाच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट लाभ हस्तांतरणाद्वारे (DBT) निधी जमा करण्यात येत आहे. पहिला हप्ता माहे डिसेंबर ते मार्च रु २०००, दुसरा हप्ता एप्रिल ते जुलै रु.२०००, तिसरा हप्ता ऑगस्ट ते नोव्हेंबर रु.२००० असा असेल. राज्यात पी.एम.किसान योजनेच्या एकूण १६ हप्त्यांमध्ये शेतकरी कुटुंबाच्या खात्यावर एकुण रु २९६३०.२४ कोटी रक्कम जमा करण्यात आलेली आहे.देशातील एकूण ९.२० कोटी शेतकऱ्यांना सुमारे २० हजार कोटी रक्कम वितरित करण्यात येणार असून त्यामध्ये राज्यातील एकूण ९०.४८ लाख लाभार्थींना रक्कम रू. १८४५.१७ कोटी वितरीत होणार आहेत, खरीप हंगामामध्ये शेतकऱ्यांना पिकाचे सुधारित बियाणे, खते घेणे, पेरणी करणे इत्यादी शेती कामासाठी या निधीचा निश्चित चांगला उपयोग होणार आहे .

## आंतरराष्ट्रीय योग दिनामध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे : निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार

*** योग क्रिया नियमित केल्यास निरोगी व सुदृढ आरोग्य लाभते * हरीभाई देवकरण प्रशालेच्या प्रांगणात २१ जून रोजी सकाळी सात ते आठ या वेळेत योग दिन साजरा होणार, २० जून रोजी जनजागृती' रॅलीचे आयोजन * स्वत: व समाजासाठी योग यावर्षीची संकल्पना * केंद्रीय संचार ब्युरोमार्फत योग शास्त्र विषयांवर मल्टीमीडिया प्रदर्शनाचे आयोजन**



**सोलापूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

निरोगी व सुदृढ आरोग्यासाठी १० व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या कार्यक्रमात मोठ्या संख्येने सोलापुरकरानी सहभागी व्हावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी योग दिवस समन्वय समितीच्या बैठकीत केले. । **पान २ वर**

## छत्रपती शाहु महाराज युवाशक्ती करिअर शिबीराचे आज उद्घाटन

**सोलापूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**



शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्था, विजापूर रोड, सोलापूर व शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्था मंद्रुप यांच्यामार्फत दिनांक १९ जून २०२४ रोजी हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापुर येथे दुपारी १:३० वाजता छत्रपती शाहु महाराज युवाशक्ती करिअर शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्धाटन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी ही उपस्थित राहणार आहेत. या शिबिरामध्ये दहावी व बारावी उत्तीर्ण विदयार्थ्यांसाठी करीअर विषयक मार्गदर्शनपर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिरामध्ये विदयार्थ्यांना नामवंत शिक्षण तज्ञांकडुन भविष्यातील शिक्षण व करिअर विषयक मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच विविध शैक्षणिक संस्थांचे माहितीपर स्टॉल ही लागणार आहेत. तरी विदयार्थ्यांनी यांचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी तथा औदयोगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य एस. एम. धुमाळ यांनी केले आहे. सदर करिअर विषयक मार्गदर्शन शिबीर हे सर्व विदयार्थ्यांना व पालकांना मोफत आहे. असे औद्योगिक प्रशिक्षण संस्था सोलापूरचे प्राचार्य यांनी कळवले आहे.

## महाराष्ट्र विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी द्विवार्षिक निवडणूक कार्यक्रम जाहीर

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी द्वैवार्षिक निवडणूक जाहीर केली आहे. महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारे निवडून दिल्या जाणाऱ्या विधानपरिषदेच्या ११ सदस्यांचा कार्यकाळ २७ जुलै २०२४ रोजी संपणार आहे. या रिक्त होणाऱ्या जागांकरिता द्विवार्षिक निवडणूक होत असून यासाठी शुक्रवार, १२ जुलै २०२४ रोजी मतदान होणार आहे.विधानपरिषद सदस्य डॉ.मनीषा श्यामसुंदर कायंदे, विजय विठ्ठल गिरकर, अब्दुल्ला खान अ.लतीफ खान दुर्राणी, नीलय मधुकर नाईक, ड. अनिल दत्तात्रय परब, रमेश नारायण पाटील, रामराव बालाजीराव पाटील, डॉ.वजाहत मिर्झा अथर मिर्झा, डॉ.प्रज्ञा राजीव सातव, महादेव जगन्नाथ जानकर आणि जयंत प्रभाकर पाटील हे २७ जुलै २०२४ रोजी विधान परिषदेतून निवृत्त होत आहेत.या निवडणुकीसाठी मंगळवार, २५ जून २०२४ रोजी अधिसूचना जारी केली जाईल. मंगळवार, २ जुलै, २०२४ पर्यंत उमेदवारांना अर्ज दाखल करता येईल. उमेदवारांनी दाखल केलेल्या अर्जांची छाननी बुधवार, ३ जुलै, २०२४ रोजी केली जाईल, तर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत शुक्रवार, ५ जुलै, २०२४ अशी आहे. शुक्रवार, १२ जुलै, २०२४ रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत या निवडणुकीसाठी



मतदान होईल. तर त्याच दिवशी ५ वाजेनंतर मतमोजणी करण्यात येईल. ही संपूर्ण प्रक्रिया दिनांक १६ जुलै, २०२४ पर्यंत पूर्ण होईल, असे भारत निवडणूक आयोगाने प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## सर्वोच्च न्यायालयात 'विशेष लोकअदालत-२०२४' सप्ताहाचे आयोजन

### दि.२९ जुलै ते ३ ऑगस्ट दरम्यान सुनावणी

**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

सर्वोच्च न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या खटल्याकरिता २९ जुलै ते ३ ऑगस्ट २०२४ रोजी 'विशेष लोकअदालत-२०२४' सप्ताहाचे आयोजन केले आहे. या लोकअदालतीमध्ये सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली तडजोडपात्र प्रकरणे तडजोडीसाठी ठेवली जाणार आहेत.

अशी माहिती तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश डी एन सुरवसे यांनी दिली आहे.जिल्ह्यातील ज्या पक्षकारांची प्रकरणे सर्वोच्च न्यायालयामध्ये प्रलंबित असल्यास व ती तडजोडीने मिटवावीत अशी ज्यांची इच्छा असेल ती प्रकरणे विशेष लोक अदालतीमध्ये ठेवता येऊ शकतात. या लोकअदालती मध्ये पक्षकार प्रत्यक्ष किंवा अभासी पद्धतीने सहभागी होऊ शकतात. जिल्ह्यातील प्रकरणे मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष लोकअदालती मध्ये ठेवण्यासाठी संबंधित वकिलांना कल्पना द्यावी किंवा अधिक माहितीसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर किंवा तालुका विधी सेवा समिती, पंढरपूर यांच्याकडे संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश सलमान आझमी तसेच तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश डी एन सुरवसे यांनी केले आहे.






## महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने गोगांव सरपंच वनिता सुरवसे यांच्या वाढदिवासानिमित्त शालेय साहित्य व खाऊ वाटप

**अक्कलकोट/दैनिक यशसिध्दि न्यूज**

सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्र च्या सोलापूर जिल्हा समन्वयक तथा गोगांवचे सरपंच सौ वनिता सुरवसे यांच्या वाढदिवासानिमित्त अभिनव उपक्रम राबवण्यात येणार असून ग्रामपंचायत कर भरणाऱ्या शेतकऱ्यांना पीक विमा अर्ज मोफत भरण्यात येणार असल्याचे माहिती उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांनी केले आहे. जिल्हा परिषद शाळा गोगांव येथे सरपंच सौ वनिता सुरवसे यांच्या वाढदिवासानिमित्त विविध कार्यक्रम घेण्यात आले यावेळी सर्व मुला मुलींना शालेय साहित्य व खाऊ वाटप करण्यात आले.यावेळी बोलताना कमलाकर सोनकांबळे म्हणाले की सरपंच महिला असून ही गोगांव गावाच्या विकासकामासाठी सतत प्रयत्नशील आहेत

गावात मोठ्या प्रमाणात विकास कामे प्रगती पथावर आहेत सरपंच यांच्या वाढदिवसाच्या निमित्त गावामध्ये १०१ वृक्षाचे रोपण करण्यात येणार आहे यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई व सिद्धार्थ सोशल फाउंडेशनच्या वतीने सर्व मुला मुलींना शालेय साहित्य व खाऊ वाटप करण्यात आले.कार्यक्रमास उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, ग्रामसेवक विक्रम घाटे, नागेंद्र आलूरे, किरण गायकवाड , मुख्याध्यापक दयानंद चोळे, पूडलिक वाघमारे, शंकर कारभारी, दत्ता गायकवाड, ज्योती आलूरे महादेव चव्हाण, किरण गायकवाड, नामदेव बनसोडे, आनंद बनसोडे आदी उपस्थित होते

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय

### ते पाहावे लागेल...

मोदींच्या अगोदरच्या दोन विजयात महाराष्ट्राने मोठा वाटा उचलला होता. यंदा मात्र तसे झाले नाही. त्याला प्रमुख कारण म्हणजे गेल्या वर्ष-दीड वर्षांत महाराष्ट्राच्या राजकारणात झालेली प्रचंड उलथापालथ. लोकसभेच्या निवडणुकीकडे विशेष लक्ष यासाठी होते की राज्यातील जनता या तत्त्वशून्य फोडाफोडीकडे कसे पाहते याचा त्यातून कौल मिळणार होता. मतदारांनी ‘फोडा आणि राज्य करा’ला थारा दिला नसला तरी बरेच प्रश्न अद्याप अनुत्तरित आहेत. त्यांची उत्तरे विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतरच मिळणार आहेत. महाराष्ट्राला डबल इंजिन सरकारसोबत जायचे आहे का, राज्यात खरेच कोणावर अन्याय झाला होता की आतापर्यंत जे झाले त्याला राजकारणाचा भाग म्हणून सोडून द्यायचे आहे याचा फैसला राज्यातील जनता करणार आहे. त्या दृष्टिकोनातून विचार करता विधानसभेची निवडणूक हेच अंतिम युध्द असणार आहे व त्याला आता काहीच महिने बाकी आहेत. गेली विधानसभा निवडणूक भाजप आणि शिवसेना यांनी एकत्र लढवली. या युतीला स्पष्ट बहुमत मिळाले. तथापि, शब्दांच्या कथित फिरवाफिरवीवरून बिनसले. उध्दव ठाकरेंनी काँग्रेस राष्ट्रवादीशी हातमिळवणी करत अडीच वर्षे ुख्यमंत्रिपद उपभोगले. नंतर त्यांच्या पक्षालाच सुरूंग लावत पंगू करण्यात आले. महागाई, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, कांद्याबाबतचे केंद्र सरकारचे धरसोडीचे धोरण हे प्रमुख मुद्दे आहेत. भाजपला महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीत सहानुभूतीच्या लाटेसोबतच या मुद्द्यांचाही फटका बसला. लोकसभेतील पीछेहाटीनंतरही किमान आज राज्यात निवडणूक जाहीर झाली तर उध्दव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस हेच दोन प्रमुख चेहरे राहणार आहेत. काँग्रेस हा तिसरा प्रबळ फॅक्टर आहे. तथापि, आज त्यांच्याकडे राज्याचा नेता म्हणून पाहावा असा चेहरा नाही. त्याखेरीज अजित पवार, एकनाथ शिंदे आणि खुद्द शरद पवार व इतर लहानसहान पक्ष आहेतच. अंतिम युध्दाची जुळवाजुळव झाली आहे. पुन्हा पळवापळवीचा हंगामही सुरू होईल. पुढील दोन-अडीच महिन्यांत प्यादी सरकवली जातील. लढाई सुरू होण्याच्या अगोदरच बेरीजवजाबाकी केली जाईल. आता प्रश्न राज्याचा नेता निवडण्याचा आहे. त्याकरता मतदारांसमोर पर्यायही आहेत. शिवाय कोणतीही निवडणूक लढवताना सगळ्यांना समान संधी असली पाहिजे, असे अपेक्षित असते. लोकसभेच्या निकालाने सगळ्यांना ती संधी दिली आहे. आता या निर्णायक युध्दात कोणाची सरशी होते ते पाहावे लागेल.

पान १ वरुन

### आंतरराष्ट्रीय योग दिनामध्ये..

केंद्रिय संचार ब्यूरो, माहिती आणि प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, योग दिवस समन्वय समिती आणि जिल्हा प्रशासन, सोलापूर यांच्या वतीने दिनांक २१ जून रोजी साजरा होणाऱ्या १० व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्र्वभूमीवर आज जिल्हाधिकारी कार्यालयात पूर्व नियोजनाची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी श्रीमती कुंभार बोलत होत्या.

यावेळी क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंकुश चव्हाण, राज्य उत्पादन शुल्कचे अधीक्षक नितिन धार्मिक, जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के, जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, विभागीय सहसंचालक डॉ नलिनी टेंबेकर, तहसिलदार समीर यादव, पोलीस आयुक्तालयाचे पोलीस निरीक्षक उदयसिंह पाटील, ग्रामीण पोलीस कार्यालयाचे पोलीस निरीक्षक राहुल देशपांडे, पोलीस प्रशिक्षण केंद्राचे पोलीस निरीक्षक भारत सावंत, राष्ट्रीय सेवा योजनाचे संचालक डॉ राजेंद्र वडजे, योग समन्वय समितीचे निमंत्रक मनमोहन भुतडा आणि क्षेत्रीय प्रचार सहायक अंबादास यादव आदी मान्यवर उपस्थित होते.

निवासी उपजिल्हाधिकारी पुढे म्हणाले की, सर्व शासकीय शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी २१ जून रोजीच्या योग दिनात सक्रिय सहभाग घ्यावा. जिल्ह्यातील सर्व शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी त्या त्या ठिकाणी योग दिनाच्या कार्यक्रमात आपला सहभाग नोंदवावा. तसेच हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणावर सोपवण्यात आलेली जबाबदारी परस्परात समन्वय ठेवून पार पाडावी. तालुकास्तरावर ही योग दिन साजरा करण्याबाबत संबंधित सर्व तहसीलदार यांना सुचित करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

जुळे सोलापुरातील गोविंदश्री मंगल कार्यालयापासून ते संत जनाबाई भाजी मार्केट, चैतन्य नगर पर्यंत २० जून रोजी योग जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले असून नागरीकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. दिनांक २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून जागतिक स्तरावर मोठया प्रमाणात साजरा केला जातो. यावर्षी देशभर माघील १०० दिवसापासून ‘योग महोत्सव’ साजरा करण्यात येत आहे. यामध्ये प्रामुख्याने भारत सरकारची सर्व मंत्रालयाने उत्सफुर्तपणे सहभाग घेउन रोज ‘कॉमन योग प्रोटोकॉल’ प्रमाणे सराव करत आहेत, अशी माहिती क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंकुश चव्हाण यांनी दिली.

स्वत: व समाजासाठी योग ही यावर्षीची संकल्पना आहे. यावर्षीचा हा दहावा आंतरराष्ट्रीय योग दिन हरिभाई देवकरण प्रशालेच्या क्रीडांगणावर दि. २१ जून २०२४ रोजी सकाळी ७ ते ८ यावेळेत साजरा करण्यात येणार आहे. केंद्रिय संचार ब्युरोच्या वतीने दिनांक २० ते २१ जून पर्यंत हरिभाई देवकरण प्रशालेच्या मुळे सभागृहामध्ये आयुष मंत्रालयाद्वारे निर्देशित केलेल्या ‘कॉमन योगा प्रोटोकॉल’ आणि भारतीय योग शास्त्र या विषयांवर मल्टीमीडिया प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येणार आहे. या प्रदर्शनामध्ये भारतीय योग, विविध योगासने, प्राणायम, ध्यान याविषयी माहिती देणारे चित्र व मजकुरासह लोकांना बघता येणार आहे.

हे प्रदर्शन सकाळी १० ते ५ वाजेपर्यंत सर्वांसाठी विनामूल्य असणार आहे, अशी माहिती श्री चव्हाण यांनी देऊन सर्व संबंधित शासकीय यंत्रणा व योग संस्था यांनी करावयाच्या कामाची सविस्तर माहिती बैठकीत दिली.

या बैठकीसाठी एन सी सी ९ व ३८ बटालियनचे नायब सुभेदार बंडू गळवे, तालुका क्रीड अधिकारी सत्येन जाधव, नेहरू युवा केंद्र संघटनचे अजित कुमार, जिल्हा परिषदचे एन डी धोत्रे, योग साधना मंडळाच्या अध्यक्षा रोहिणी उपळाईकर, विवेकानंद केंद्राचे नंदकुमार चितापुरे, भारतीय योग संस्थानचे डी पी चिवडशेट्टी, बी एन पाटील, पतंजली योग पिठाच्या सुजाता सुतार, रघुनंदन भुतडा, सुरेंद्र पिसे, योग सेवा मंडळाचे सचिव जितेंद्र महामुनी, योग असोसिएशनचे उपाधाय्क्ष दत्तात्रय वेदपाठक, महाराष्ट्र राज्य भारत स्कॉउट गाईड कार्यालयाच्या जिल्हा संघटक अनुसया सिरसाट, हरिभाई देवकरण प्रशालेचे क्रीडा शिक्षक प्रमोद चुंगे आणि केंद्रीय संचार ब्युरोचे कार्यालय सहायक जे एम हन्नुरे इत्यादी उपस्थित होते

## जो दुसऱ्यावरी विश्वासला त्याचा कार्यभाग बुडाला.
## डॉ.बाबासाहेब आंबेडकर (१९ जून १९३८)

प्रासंगिक लेख :

**मित्र हो,**बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकराईट चळवळीच्या अनुषंगाने इतिहासाकडे वळून पाहताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९ जून १९३८ ला चाळीसगांव येथील सभेत जो दुसऱ्यावरी विश्र्वासला त्याचा कार्य भाग बुडाला. असे का म्हटले होते? ते आजही किती प्रासंगिक आहे? याची जाणीव ठेवून मार्गक्रमण करण्याची नितांत आवशयकता आहे. म्हणून हे चार शब्द लेखाच्या स्वरूपात आपल्या माहितीस्तव.

ही खंत स्वातंत्र्य पूर्व काळात व्यक्त केली असल्याने तेव्हा ब्रिटिश सरकारचे राज्य आपल्या देशावर होते, असे वरवर बघता वाटत असले तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मात्र तत्कालीन स्थितीचे वर्णन करताना म्हटले होते की, आपल्यावर जे सरकार सध्या राज्यकारभार करते ते ब्रिटिश सरकार नसून काँग्रेस सरकार आहे. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ब्रिटिश सरकार सोबत ११ वर्षाचा तर काँग्रेस सोबत ११ महिन्याचा अनुभव होता. त्या अनुभवाच्या आधारे काँग्रेस कडून असलेल्या अपेक्षा फोल ठरल्याचे बाबासाहेब आंबेडकरांनी नमूद केले आहे. कारण ब्रिटिश सरकारकडून थोडेफार तरी सहकार्य मिळायचे ते पण काँग्रेस कडून मिळेनासे झाल्यावर उद्वेगजनक भावनेतून असे म्हणावे लागले होते. त्या काळात काँग्रेसचे सुत्रधार गांधीं होते. परिणामी 'राजा बोले - दल हाले' या उक्ती प्रमाणे गांधी बोलेल ते काँग्रेस करायची पण गांधींला अस्पृश्याविषयी कळवळा नसल्याने अस्पृश्यांना फार काही मिळण्याची सुतराम शक्यता नव्हती. त्यामुळे काँग्रेस आणि गांधींवर विश्र्वास ठेवण्यात फारसे तथ्य नाही याची जाणीव झाल्याने जो दुसऱ्यावरी विश्र्वासला त्याचा कार्य भाग बुडाला असे म्हणावे लागले. करिता आपले कार्य आपणच पार पाडले पाहिजे. तेव्हा बाबासाहेब म्हणाले होते की, काँग्रेसला कुणाची भिती वाटत असेल तर ती स्वतंत्र मजूर पक्षाची होय.

जेव्हा की स्वतंत्र मजूर पक्षाचे केवळ १५ प्रतिनिधी सभागृहात होते, जे काँग्रेसच्या नाकीनऊ आणत होते. म्हणून मूलनिवासी बहुजन समाजातील पक्ष संघटनांना नेस्तनाभूत करण्याचे काम काँग्रेस कडून सातत्याने केले जात आहे. करिता एकदा बाबासाहेब काँग्रेस हे जळते घर आहे. असे सुद्धा म्हटले होते तरीही मूलनिवासी बहुजन समाजातील नेतृत्व काँग्रेसच्या वळचणीला का जातो? अशा सर्व अनाकलनीय प्रश्र्नांची उत्तरे शोधून आपण आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. अन्यथा ही मंडळी आपल्या जनतेचा फक्त वापर करून घेतील. हे बाबासाहेब आंबेडकरांच्या काळापासून आजतागायत पहायला मिळत आहे. सद्यस्थितीत नुकत्याच लोकसभेच्या निवडणुकीचे निकाल पाहिल्यावर मूलनिवासी बहुजन समाजातील राजकीय पक्षांची वाटचाल शून्याकडे झाल्याचे पहायला मिळत आहे. अशाप्रकारे ते नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत की काय? हे केवळ मूलनिवासी बहुजन समाजातील राजकीय अस्तित्वाचे अध:पतन नाही तर सामाजिक अस्तित्वाचे ही अध:पतन आहे. अशी विदारक परिस्थिती निर्माण झाली आहे. ज्यामुळे मूलनिवासी बहुजन समाज नैराश्यातून हवालदिल झाला आहे. परिणामी मूलनिवासी बहुजन समाजात नेतृत्वाची निर्वात पोकळी निर्माण झाल्याचे पदोपदी जाणवत आहे. यातून धडा घेऊन मार्गक्रमण केले पाहिजे.

याच अनुषंगाने विचार करता डॉ. बाबासाहेब आंबेडकर १७ जून १९३८ ला स्वतंत्र मजूर पक्षाचे असेंब्लीत निवडून आलेल्या १५ प्रतिनिधींच्या कामगिरीबद्दल बोलताना म्हणाले होते की, राजकारणातील आपली प्रगती ब्रह्मदेव जरी आड आला तरी थांबवू शकणार नाही. हे मर्मभेदी आव्हान अनुयायी कसे काय विसरले असावेत? हा प्रश्र्न अनुत्तरित आहे. जसे त्या काळात बाबासाहेब आंबेडकरांना स्वतंत्र मजूर पक्ष बलवान केला पाहिजे असे वाटत होते. तसे अनुयायांना आपले पक्ष बलवान करावे असे आज का वाटत नसावे? त्या काळात वल्लभभाई पटेलांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिस्तीचे वर्णन करताना म्हटले होते की, 'संघटना असावी तर डॉ. आंबेडकरांच्या संघटनेसारखी!' असे संघटन निर्माण करण्यात अनुयायी कुठे कमी पडत आहेत? याचा सर्व हितचिंतकांनी शोध घेण्याची नितांत आवश्यकता आहे. वर्तमान काळात संघटना उदंड जाहल्या पण त्यात शोधूनही संघटन पहायला मिळत नाही. अशा संघटन विरहीत संघटना समाजाची फसवणूक करीत आहेत. त्यांना योग्य दिशेला वळविण्यासाठी समाजातील सुशिक्षित लोकांनी आपली भूमिका पार पाडण्याची नितांत आवश्यकता आहे. अन्यथा समाजातील शिक्षित, उच्च शिक्षित आणि अती उच्च शिक्षित लोक त्यांच्या स्वार्थासाठी या समाजाचा फक्त वापर करून घेतील. याची जाणीव ठेवून मार्गक्रमण होणे गरजेचे आहे. या आशेपोटी बाबासाहेब म्हणाले होते की, काही जबाबदार तरूण निपजतील व ही जबाबदारी ते आपल्या शिरावर घेतील. तर ही जबाबदार तरुण नेमके कुठे आहेत? याचा शोध घेण्यासाठी आता मायक्रोस्कोपची गरज भासत आहे, ही या समाजाची शोकांतिकाच नव्हे! काय? ही दुरावस्था आपली का झाली आहे? याचा विचार केला तर हे लक्षात येते की, ज्या समाजाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिका (शिकवा), संघर्ष करा (चेतवा) आणि संघटीत व्हा असा संदेश दिला होता. तो समाज मात्र संघटीत होण्यापासून कोसो दूर आहे. अनुयायांनी स्वतःला प्रश्र्नांकित केले पाहिजे की, ते नेमके कुठे आणि कसे संघटीत आहेत? जर ते कुठेच संघटीत नसतील तर मग ते इतरांना संघटीत कसे करू शकतील? आपण जिथे कुठे संघटीत असाल तिथे आपण नेमके काय करीत आहात? त्या संघटनेच्या उद्दिष्ट पूर्तीसाठी तिथे काय प्रयत्न केले जातात आणि आपली भागिदारी किती? आपण कार्यरत असलेल्या संघटनेची मागील पाच वर्षातील सदस्यता किती आहे? आपण कार्यरत असलेले संघटन मुखपत्र प्रकाशित करते काय? असल्यास समाज जीवनात किती जनतेपर्यंत वितरित होते? ते होत नसेल तर कुणाच्या बळावर आपण निर्धारित उद्दिष्ट पूर्ण करणार आहोत? इत्यादी प्रश्र्न आपण स्वतःलाच विचारून सोडवणूक केली पाहिजे. करिता तत्कालीन परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हे पण स्पष्ट केले होते की, आपल्या स्वतःच्या दुष्कृत्यामुळे आपणास जनावरांचीही किंमत राहिली नाही. जेव्हा आपली माणसे मृत जनावरांचे मास खात होते. हे मास त्या लोकांनी खाल्ले नसते तर निश्र्चितच ते इतर जनावरांनी खाल्ले असते. म्हणून तेव्हा हे स्पष्टीकरण दिले आहे. पण आज सुद्धा समाजातील काही लोक व्यक्तीगत स्तरावर प्रगतीपथावर असले तरी सामाजिक दृष्टीने बहुतांश समाज अजुनही प्रगती पासून कोसो दूर आहे. याला आमचीच कृतीशीलता कारणीभूत असल्याचे स्विकार केले पाहिजे. याची जाणीव ठेवून समाजातील डॉक्टर, वकील, इंजिनिअर आणि उच्च पदस्थ अधिका-यांनी उर्वरित वंचित मूलनिवासी बहुजन समाजाला जीवनाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आपली भूमिका जबाबदारीने पार पाडली पाहिजे.

संदर्भीय दोन्ही भाषणाचा वृतांत समजून घेऊन इतरांना समजावून सांगण्याचा आपण सर्वांनी मिळून प्रयत्न केला, तर नव्याने उभारी घेता येईल. तेव्हा मात्र राजकारणातील आपली प्रगती ब्रह्मदेवही थांबवू शकणार नाही. हे साकार करण्यासाठी विश्र्वासपात्र हितचिंतकांची वैचारिक पायाभरणी करावी लागेल जेणेकरून वैचारिक तडजोडीला ते बळी पडणार नाहीत. परिणामी भारताचे संविधानाला अपेक्षित समता, स्वातंत्र्य, मित्रता व न्यायावर आधारित वैज्ञानिक दृष्टिकोनातील नव समाज निर्माण होऊ शकेल. म्हणून चला आंबेडकरवादाकडे आणि संघटीत व्हा आंबेडकरवादाच्या छत्रछायेखाली जेणेकरून आंबेडकरवादाचे उद्दिष्ट साकार करता येईल.

**लेखक : बी. बी. मेश्राम,**

**अभ्यासक, संचालक : फुले, शाहू, आंबेडकराईट स्टडी सर्कल, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र. संपर्क : ९४२१६७८६२८**

## चरबी कमी करायची असेल तर खा रोज एक चमचा साजूक तूप

लो-कार्ब हाय फॅटमधली महत्वाचा घटक म्हणजे 'साजूक तूप' होय. तूप प्रत्येकजण खातोच.. त्याचे फायदेही अनेक आहेत. तूप खाल्ल्याने चरबी कमी होते, हे तुम्हाला माहितेय का? होय हे खरेय... याबद्दल कार्डियो-मेटाबोलिक । स्पोटर्स न्यूट्रिशन कन्सल्टंट डॉ. मृदुल कुंभोजकर यांनी माहिती दिली आहे. पाहूयात तूपाबद्दलची सविस्तर माहिती.

भारतातील प्रत्येक खाद्यपदार्थात तूप पारंपारिकपणे वापरले जाते. पण आपण तूप हे भातावर, पराठ्यावर, पुरणपोळीवर थालीपीठावर ई. हयावरती टाकून खातो. तुप स्वयंपाक करण्यासाठी वापरत नाही. आणि इथेच गल्लत होते. तूप स्वयंपाकासाठी उत्तम आहे. सर्वोत्तम तूप म्हणजे गीर गायीचे तूप, तूप हे पुयर सच्यूरटेड फट आहे (गुड कॉलेस्ट्रॉल). सच्यूरटेड फट ह्याब्द्दल बरेच गैरसमज आहेत, की हे फटस हृदयविकार रोगांना आमंत्रित करतात वगैरे. पण तसं खरतर नाहीये. कोणतेही हृदयरोग विकार हे परिष्कृत कार्बोदकेयुक्त पद्धार्थ खाल्ल्याने होतात हे आपण मागच्या लेखात पाहिलयं. त्यामुळे तो संभ्रम पूर्ण मनातून काढून टाका. तूप खाल्ल्याने आपोआप शरीराला जीवनसत्त्वे ए, डी, ई, के (फॅट-सोल्युबल विटामिन्स) मिळतात. तूप हे सर्व अश्या फट सोल्युबल घटकांनी समृद्ध आहे. आणि म्हणून डोळ्यांच्या व्याधी, हाडांची समस्या ह्या सगळ्यातून तूप खाल्ल्याने मुक्ति मिळते. निरोगी दृष्टी राखण्यापासून ते चमकदार त्वचेपर्यंत प्रत्येक गोष्टीत भूमिका बजावतात. ही जीवनसत्त्वे आणि सर्व अत्यावश्यक पोषक तत्त्वे व मौखिक आरोग्यासोबत भूमिका बजावण्यासाठी देखील आवश्यक आहेत. तूप हे हिरड्या निरोगी ठेवते, दात मजबूत ठेवतात ई. कारण दात मजबूत ठेवण्यासाठी व्हिटॅमिन-डी लागतं आणि व्हिटॅमिन-डी हे ऑलरेडी कॉलेस्ट्रॉल म्हणजेच फटस पासून बनलेलं आहे, त्यामुळे फटस खाणं हे गरजेचं आहे.



तुपात कोणतेही लॅक्टोज आणि केसिन नाही - तुपाचा सर्वात मोठा फायदा म्हणजे ते लॅक्टोज मुक्त आहे. त्यामुळे लैक्टोज असहिष्णुता असलेल्या रुग्णांसाठी उत्तम. लॅक्टोज असहिष्णुतेची लक्षणे म्हणजे फुगणे, पोट फुगणे, मळमळ होणे, गुरगुरणे, पेटके येणे इत्यादी. जेव्हा एखादी व्यक्ती लैक्टोज मुक्त अन्न घेते तेव्हा हे सर्व नाहीसे होतात आणि तूप त्यापैकी एक आहे.

व्हिटॅमिन क समाविष्ट आहे, हाडांच्या आरोग्यासाठी आवश्यक आहे ह्व तूप तुम्हाला काही व्हिटॅमिन के देखील प्रदान करते. व्हिटॅमिन के हाडांच्या आरोग्यासाठी आवश्यक आहे, हाडांमध्ये व्हिटॅमिन डी टिकवून ठेवण्यासाठी, व्हिटॅमिन के आवश्यक आहे, तूप थोड्या प्रमाणात पुरवते. पण एकंदरीत निरोगी आहार आणि जीवनशैली यांच्यात फरक पडू शकतो. व्हिटॅमिन के हे मुळात रक्त गोठण्यासाठी असते, जर तुमच्या शरीरातून गंभीर रक्त जात असेल, तर तुम्हाला व्हिटॅमिन केची कमतरता आहे.

मध्यम-साखळीतील फॅटी ऍसिडस् निरोगी वजन कमी करण्यास प्रोत्साहन देतात - खोबरेल तेल, तूप इत्यादी एमसीटी वजन कमी करण्यासाठी सर्वोत्तम आहेत. तुपामध्ये संयुग्मित लिनोलिक ऍसिड असल्याने, जे तुपात आढळणारे एक प्राथमिक ऍसिड आहे, तसेच शरीरातील चरबी कमी होण्याशी संबंधित आहे. आहे

दररोज एक चमचा खोबरेल तेल खाल्ल्याने शरीरातील चरबी कमी होण्यास मदत होते. ब्युटीरेटचा उत्कृष्ट स्रोत जो पचन सुधारतो - ब्युटीरेट ऍसिड, एक शॉर्ट चेन फॅटी ऍसिड आहे जे आतड्याच्या आरोग्यासाठी भूमिका बजावते. हे इन्सुलिन संवेदनशीलता, जळजळ लढण्यास आणि सर्व आतडे आरोग्य सुधारण्यास मदत करते. इष्टतम पाचक आरोग्य राखण्यासाठी हे महत्त्वपूर्ण आहे. ब्युटीरेट आतड्याची जळजळ दूर करते. तुपाचे हे काही प्रमुख आरोग्य फायदे आहेत. वजन कमी करणे शाश्वत असले पाहिजे. म्हणून, अन्नपदार्थ आहेत जे खरोखर चरबी कमी करण्यास मदत करतात.


## शासकीय कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० करण्यास सरकार सकारात्मक

मुंबई : शासकीय कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करण्याबाबत सरकार सकारात्मक असल्याची माहिती असून, याबाबत राजपत्रित अधिकारी महासंघाची या मागणीसंदर्भात नुकतीच सरकारसोबत बैठक झाली. या बैठकीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते. मुख्यमंत्री शिंदे यांनी या बैठकीमध्ये सरकारी कर्मचाऱ्यांचे निवृत्तीचे वय ६० वर्षे करण्याबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन दिल्याची माहिती महासंघाकडून देण्यात आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सह्याद्री अतिथीगृह येथे अधिकारी महासंघ आणि प्रशासनासोबत संयुक्त बैठक पार पडली. यावेळी अनुभवी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा प्रशासनाला अधिक उपयोग व्हावा, या उद्देशाने सरकारने कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीचे वय ५८ वरून ६० वर्षे करण्याबाबत चर्चा झाली. यावेळी दोघांकडून सेवानिवृत्तीच्या वयाबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन देण्यात आले. त्याचप्रमाणे केंद्र सरकारने कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ४६ टक्क्यांवरून ५० टक्के केला आहे. त्याबाबतचा प्रस्ताव राज्याच्या वित्त विभागाच्या अपर मुख्य सचिवांनी तयार केला आहे. तो शासनाने तत्परतेने मंजूर करावा,

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# राज्याचे मुख्य सचिव डॉ.नितीन करीर यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन





**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

राज्याचे मुख्य सचिव डॉ.नितीन करीर यांनी आज श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या हस्ते शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला.याप्रसंगी महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार , मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे,अपर जिल्हाधिकारी मोनिकासिंग ठाकूर, उपविभागीय अधिकारी सचिन इतापे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, तहसिलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशील संसारे, मंदिर समितीची व्यवस्थापक बालाजी पुदलवाड, नायब तहसीलदार मनोज श्रोत्री यांच्यासह मंदिर समितीचे कर्मचारी उपस्थित होते. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर संवर्धन व जीर्णोद्धार कामे पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून, सदर कामाची पाहणी राज्याचे मुख्य सचिव डॉ.नितीन करीर यांनी केली. यावेळी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात सुरू असलेल्या व करण्यात येणाऱ्या कामांची माहिती यावेळी दिली.

# पोलीस उपनिरीक्षक आनंद जाधव यांचा डॉ.आंबेडकर इंग्लिश स्कूलच्या वतीने नळदुर्ग येथे सत्कार



**दैनिक यशसिद्धी न्यूज**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : नळदुर्ग पासुन जवळच असलेल्या बोरगाव ( तुपाचे ) येथील सुपुत्र आनंद जाधव यांचा बिड जिल्ह्यातील शिरशाळा पोलीस ठाण्याचे पोलीस उप निरीक्षक पदी निवड झाली आहे त्या बद्दल त्यांचा डॉ.आंबेडकर इंटर नॅशनल इंग्लिश मिडीयम स्कूल वतीने नळदुर्ग येथे नुकताच सत्कार करण्यात आला .

पोलिस उप निरीक्षक आनंद जाधव हे तुळजापूर तालुक्यातील बोरगाव (तुपाचे) येथील मुळ रहिवासी असून त्यांनी महाराष्ट्र पोलीस दलात काही काळ पोलीस शिपाई म्हणून काम करत करत महाराष्ट्र लोकसेवा आयोग ची परीक्षा उत्तीर्ण होऊन पोलीस उपनिरीक्षक म्हणून सेवेत दाखल होताच त्यांना नक्षलवादी परिसरात गडचिरोली येथे दिवटी देण्यात आली.तब्बल चार वर्षे यशस्वीरीत्या आपले कर्तव्य बजावून सध्या बिड जिल्ह्यातील शिरशाळा पोलीस ठाणें ता.परळी येथे पोलीस उप निरीक्षक म्हणून रूजू झाले असून त्यांनी नुकतच सम्यक सेवाभावी संस्था नळदुर्ग संचलित डॉ.आंबेडकर इंटर नॅशनल इंग्लिश मिडीयम स्कूल नळदुर्ग येथे सदिच्छा भेट दिली असता शाळेचे संस्थापक अध्यक्ष मारुती खारवे व प्रा.भगवान चिमणे यांच्या हस्ते त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. या वेळी संपादक तथा बौध्दाचार्य दादासाहेब बनसोडे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष अध्यक्ष तथा रिपाइं (आठवले) युवा आघाडी चे जिल्हा कार्याध्यक्ष अरुण लोखंडे, रिपाइं चे जिल्हा सचिव एस.के.गायकवाड, दलित पँथरचे जिल्हा संपर्क प्रमुख शाम नागीले, अरविंद लोखंडे, शंकर भाळे आदीजनाच्या उपस्थित करण्यात आला यावेळी डॉक्टर आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूल चे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वृंद उपस्थित होते

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस के गायकवाड यांनी केले तर शेवटी आभार शाम नागिले यांनी मानले

# निकृष्ट कामांची तालुक्यात माळ; माहिती देण्यास मात्र टाळाटाळ.

## मंगरूळपीर तालुका सार्वजनिक बांधकाम विभागातील प्रकार

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

मंगरूळपीर/ तालुका प्रतिनिधी : सार्वजनिक बांधकाम विभाग मंगरूळपीर अंतर्गत सुरू असलेल्या अनेक विकास कामांमध्ये निकृष्ट दर्जाचे काम होत असल्याची चर्चा परिसरातील महिला व पुरुष करत आहेत. परिसरातील नागरिकांच्या समस्येवर कुठलीही साद न देणारे अभियंता मात्र कंत्राटदारांना उत्तम प्रतिसाद देत असल्याचे दिसून येत आहे.




सदर कामे सुरू असताना कनिष्ठ अभियंत्यांचे त्या ठिकाणी लक्ष नसते. अभियंता यांच्या देखरेखित कामे होत नसल्याने कामात वापरल्या जाणारी साहित्य हे उत्कृष्ट दर्जाचे आहे किंवा नाही याबाबत नागरिकांमध्ये नेहमी संभ्रम असतो. कंत्राटदार सर्वच बांधकाम विभागाच्या काही अधिकाऱ्यांना हाताशी घेऊन निव्वळ नफेखोरी च्या भावनेतून काम करत असल्याचे दिसून येत आहे. मात्र मागील वर्षात झालेल्या सर्वच कामांची मोजमाप पुस्तिका तसेच कंत्राटदारांना अदा केलेल्या बिलाच्या पावत्या मागितल्यावर बांधकाम विभागातील अधिकारी का टाळाटाळ करतात. यामागे प्रमुख उद्देश काय. संभाव्य टक्केवारीचा प्रघात सुरू ठेवण्यासाठी तसेच टक्केवारीचा भूतकाळात झालेल्या संभाव्य व्यवहार झाकून ठेवण्यासाठी अशी माहिती देण्यास अधिकारी टाळाटाळ करतात का हा प्रश्न अधोरेखित होत आहे.

सामान्यतः कुठलेही काम पूर्ण झाल्यावर त्या कामाची मोजमाप होत असते व त्या मोजमापनुसारच त्या कामाचे बिल तयार होते सदर बिल तयार करणे ही त्या भागातील कनिष्ठ अभियंत्यांची जबाबदारी असल्याचे कळते. परंतु जर बुडातूनच एखादी गोष्ट चुकीची असेल तर त्याचा शेवट सुद्धा चुकीचा होत असतो. कदाचित या भीतीमुळे तर अधिकारी माहिती लपवत नसतील ना अशी चर्चा तालुक्यातील सुज्ञ नागरिक करत असतात. माहिती अधिकारांमध्ये मागितलेली माहिती सुद्धा दिली जात नाही व माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी जाब विचारल्यास तुम्हाला अपील मध्ये जायचे असेल तर तुम्ही जाऊ शकता अशा पद्धतीचे उर्मठ उत्तरे दिली जातात. टक्केवारीच्या प्रघातामुळे खिशे भरून गेल्यामुळे अशा पद्धतीची मगरुरी अधिकारी मध्ये येणे स्वाभाविक आहे. जाब विचारणाऱ्या नागरिकांना प्रतिसाद देणे हे सुद्धा अधिकारींचे काम आहे. अन्यथा नागरिकांचा प्रशासनावर रोष वाढत असतो, असे मत गट ग्रामपंचायत जाम अंतर्गत शहापूर येथील सदस्य सौरभ सपकाळ यांनी व्यक्त केले.तसेच बांधकाम पूर्ण झालेल्या रस्त्याचे काठ हे जमिनीपासून उंच असल्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे असे वारंवार कनिष्ठ अभियंतांना सांगितल्यावर ही त्यावर कुठलीही प्रक्रिया झाली नाही अशी खंत परिसरातील नागरिक रवी म्हातारमारे यांनी व्यक्त केली.

# अर्चनाताई पाटील यांची बोळेगावास सदिच्छा भेट

**वागदरी/एस.के.गायकवाड**

सामाजिक कार्यकर्त्या तथा धाराशिव जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्षा सौ.अर्चणाताई राणाजगजितसिंह पाटील यांनी तुळजापूर तालुक्यातील बोळेगावास सदिच्छा भेट देऊन गावातील समस्या जाणून घेतल्या.

अर्चनाताई पाटील बोळेगाव भेटीस आले असता सरपंच विलास पाटील यांच्या पत्नीच्या हस्ते अर्चनाताई पाटील यांचा सत्कार करण्यात आला.या वेळी सिद्धू अण्णा कोरे , पंचायत समिती सभापती रेणुकाताई इंगोले,गावचे पोलीस पाटील कडाजी सुरवसे,ग्रामपंचायत सदस्य सुनील सूर्यवंशी,अंकुश रुपनर,उपसरपंच शांताप्पा मुलगे,सतीश सुरवसे,संजय सुरवसे, सामाजिक कार्यकर्त्या संगीता सुरवसे, अंगद जाधव, लक्ष्मण रुपनर,सोसायटी चेअरमन



महादेव काळे,अंगणवाडी सेविका बचत गटातील महिला सीआरपी युवा वर्ग गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित अशा कार्यकर्ते उपस्थित होते.

# स्वेरीतील इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांना निरोप

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मधील इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग या विभागातील अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना नुकताच निरोप देण्यात आला. त्यानिमित्त निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. स्वेरीमध्ये चार वर्षे परिश्रम केल्यामुळे आणि गुरु-शिष्याचे एक वेगळे बंधन जपल्यामुळे कॉलेज सोडताना विद्यार्थी भावनिक झाले होते.




स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व विभागप्रमुख डॉ.डी.ए.तंबोळी यांच्या नेतृत्वाखाली हा समारंभ संपन्न झाला. दीप प्रज्वलनानंतर विभागप्रमुख डॉ.डी.ए.तंबोळी यांनी विद्यार्थ्यांना करिअरसाठी व भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. ट्रेनिंग अँड प्लेसमेंटचे अधिष्ठाता प्रा. एस.एम.खोमणे व शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. एम.पी.ठाकरे यांनी विद्यार्थ्यांना पदवी उत्तीर्ण झाल्यानंतर पुढील जबाबदारीची जाणीव करून यशाचे कानमंत्र देताना भारताचे जबाबदार नागरिक होत असताना जनसेवा करावी.' असे सांगितले. तसेच यावेळी प्रा.डी.डी.डफळे, प्रा. व्ही. जे. पाटील, प्रा. एस.एस.कवडे, प्रा.एम.के.पवार, प्रा. व्ही. ए. सावंत, प्रा. एस. बी. खडके यांनी देखील मार्गदर्शन केले.

स्वेरीमध्ये चार वर्ष शिक्षण घेतल्यानंतर समारोप प्रसंगी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले आणि चार वर्षातील आपले अनुभव सादर केले. यामध्ये श्रेया शिंदोल, सार्थक लोखंडे यांच्यासह इतर विद्यार्थ्यांनी चार वर्षांच्या काळात संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली प्राध्यापक वर्गांनी आमच्याकडून अभ्यास कसा करवून घेतला? परिश्रमाद्वारे अभ्यासात सातत्य ठेवण्याबाबत तसेच प्राध्यापकांनी आम्हाला चुकीच्या वेळी दिलेली शिक्षा, त्यातून मिळालेले अनमोल शिक्षण यातून आमच्या करिअरसाठी तयार झालेली परिपक्वता आणि संस्कारित प्रतिमा या विषयी विद्यार्थ्यांनी अतिशय हृदयस्पर्शी असे अनुभव सांगितले. यावेळी आठवण म्हणून प्रत्येक विद्यार्थ्यांना स्वेरीतर्फे भेटवस्तू देण्यात आल्या. यावेळी इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग मधील सर्व विद्यार्थी व प्राध्यापक वर्ग उपस्थित होते. प्रा.आर. एन. खांडेभरड यांनी सूत्रसंचालन केले तर समन्वयक प्रा.डी.डी.डफळे यांनी आभार मानले.

# कौशल्य विकास विभागातील योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करा : कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा

**मुंबई/दैनिक यशसिद्धी न्यूज**

तालुकास्तरीय रोजगार मिळावे, नमो महारोजगार मेळावा २०२४ ची पूर्वतयारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण संचालनालयातील आगामी शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रिया यासह विभागाच्या कामकाजाचा मंत्रालय दालन येथे कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी आढावा घेतला.



कौशल्य रोजगार विभागाअंतर्गत २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त सर्व जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय संस्थांमध्ये योग दिनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत, अशा सूचना मंत्री श्री. लोढा यांनी केल्या. त्याचबरोबर रोजगार आयुक्तालय अंतर्गत तालुकास्तरीय रोजगार मेळाव्याचे स्वरूप, राज्यात आयोजित करावयाचे एकूण मेळाव्याची संख्या, आगामी तीन महिन्यात घ्यावयाच्या मेळाव्याचे नियोजन., महास्वयं पोर्टलची सद्यस्थिती, सन २०२४-२५ मध्ये नमो महारोजगार मेळावा आयोजनासाठी करावयाची पूर्व तयारी, महाराष्ट्र कौशल्य विद्यापीठाचे सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात विद्यापीठातील प्रवेश, कोर्सेस वाढविण्याबाबत केलेले नियोजन., स्वामी विवेकानंद आंतरराष्ट्रीय कौशल्य प्रबोधिनी, विद्या विहार येथील कोर्सेस, बॅचेस, संत गाडगेबाबा स्वच्छ भारत अकॅडमी तर पाच महसुली विभागात कार्यान्वित करणे,२ जुलै रोजी कौशल्य दिंडीचे आयोजन करणे, महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, सुकाणू समिती स्थापनेबाबतची सद्यःस्थिती याबाबत कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी आढावा घेतला.

या बैठकीला कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाचे सचिव गणेश पाटील, राज्य कौशल्य विकास सोसायटीच्या आयुक्त निधी शर्मा, व्यवसाय व शिक्षण प्रशिक्षण संचालनालयाचे संचालक दिगंबर दळवी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर, व्यवसाय व प्रशिक्षण मंडळाचे संचालक योगेश पाटील, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयाचे उपायुक्त डी. डी. पवार यासह इतर अधिकारी यावेळी उपस्थित होते.

# निफाड येथे संदल निमित्त भव्य ब्रास बँड जुगलबंदीचा कार्यक्रम संपन्न

**निफाड/दैनिक यशसिध्दि न्यूज**

निफाड येथे हजरत सय्यद नासिर शहावली बाबा यांचे संदल निमित्त सालाबाद प्रमाणे याही वर्षी भव्य ब्रास बँड जुगलबंदीचा कार्यक्रम दिनांक १५ जून २०२४ रोजी मामलेदार चौक निफाड येथे आयोजित करण्यात आला होता

यावेळी उस्मान शहा ब्रास बँड व वीरभद्र ब्रास बँड यांनी सहभाग घेऊन उपस्थितांची मने जिंकली, याप्रसंगी निफाड नगरपंचायतचे उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे , राजभाऊ राठी ,मधुकर शेलार, ॲडव्होकेट प्रवीण ठाकरे, सुहास सुरळीकर, संजय धारराव ,पवन चोरडिया, आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते,

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संदल कमिटीचे अध्यक्ष वकील भाई शेख, माजी अध्यक्ष सलीम भाई सय्यद, उपाध्यक्ष वसीम भाई तांबोळी, शेरखान मुलांनी, खजिनदार मुस्तकीम शेख, संघटक अझर तांबोळी, ख्वाजाभाई फकीर, आदींनी प्रयत्न केले जुगलबंदीचा आनंद घेण्यासाठी मोठ्या संख्येने सर्व स्तरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते,



# पंढरपूर कराड रोडवर कटफळ येथे भीषण अपघात पाच महिला जागीच ठार व तीन गंभीर जखमी

## मृताच्या वारसांना आमदार शिवाजी पाटील यांच्याकडून प्रत्येकी ५० हजार रुपये जाहीर

**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर कराड महामार्गावरील कटफळ येथे चौकात गावाकडे जाणाऱ्या पाच महिलांना समोरून येणाऱ्या ट्रकने जोरदार ठोकल्याने ट्रकच्या धडकेने भीषण अपघात झाला वर्धा विभागाने येणारे ट्रकने रस्त्याच्या कडेला उभे असलेल्या महिलांना धडक दिली पंढरपूर कडा रोड वरील कटफळ येथे हा भीषण अपघात झाला यामध्ये पाच महिला जागिन मृत्यू आहेत तर तीन महिला गंभीर देखील आहेत जखमींना जखमी महिलांना उपचारासाठी पंढरपूर शिफ्ट करण्यात आली आहे या दरम्यान अपघाताची माहिती मिळतात पोलीस निरीक्षक भीमराव खंणदाळे पोलीस फौज फाट्यासह घटनास्थळी दाखल झाले आहेत ग्रामस्थांनी ट्रक चालकास पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले

अपघाताची माहिती मिळतात पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली प्राथमिक माहिती अनुसार चालकांचे ट्रक वरील नियंत्रण सुटल्यामुळे हा अपघात झाल्याचे समोर आले मिळालेल्या माहितीनुसार अपघातातील मृत आणि जखमी महिला सांगोल्यातील कटफळ येथील रहिवाशाही या महिला शेतमजुरीचे काम करण्यासाठी चीक महोद येथील शेतकऱ्यांच्या शेतावर गेल्या होत्या व काम संपल्यानंतर दुपारी घरी जाण्यासाठी त्या पंढरपूर कराड रोडवरील एसटीची वाट पाहत थांबल्या होत्या त्याचवेळी पंढरपूरकडून भडगाव जाणाऱ्या ट्रकने त्यांना उडवले आज दुपारी चार वाजता हा भीषण अपघात झाला



वैशाली ड्रायव्हरचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने त्यांनी थेट या सातही महिलांना चढले हे सर्व महिला कटफळ येथील रहिवासी आहेत याबाबत ट्रक चालकाच्या विरोधात अपघात झाले की नोंद सांगोला पोलीस स्टेशनच्या अद्याप पर्यंत झाली नसल्याची समज

# धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळामध्ये प्रवेश

## ३० जूनपर्यंत ऑफलाईन पद्धतीने अर्ज दाखल करावा

**सोलापूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

इतर मागास बहुजन कल्याण विभागातंर्गत धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांकरीता शहरातील इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळांमध्ये शिक्षण देणे या योजनेंतर्गत सोलापूर जिल्ह्यामध्ये लिटील बर्ड इंग्लीश मिडीयम स्कूल मोहोळ, ता. मोहोळ जि. सोलापूर आणि श्रीराम इंग्लीश स्कूल पाणीव ता. माळशिरस, जि. सोलापूर या दोन् शाळांना नामांकित इंग्रजी माध्यमाच्या शाळा म्हणून शासनाकडून मान्यता देण्यात आलेली आहे.

धनगर प्रवर्गातील इयत्ता १ ली ते ५ वी मध्ये प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या विदयार्थ्याच्या पालकांनी सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय, सोलापूर, पत्ता ३बी/१, अ/३२, राघवेद्र नगर, सुर्या हॉटेल जवळ, राघवेंद्र स्वामी मठाच्या पाठीमागे मुरारजी पेठ, सोलापूर येथे दि.३० जून २०२४ पर्यंत ऑफलाईन पद्धतीने अर्ज दाखल करावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याणचे सहायक संचालक श्रीमती मनिषा फुले यांनी केले आहे. सदर शाळांमध्ये मोफत प्रवेशाकरिता अर्जासोबत विदयार्थ्यांचे जन्म प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र आधार कार्ड व पालकांचे एक लाख रुपये मर्यादेतील उत्पन्नाचा दाखला आदी कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. प्रवेश प्राप्त झालेल्या विदयार्थ्यांना निवास, भोजन व्यवस्था, शैक्षणिक साहित्य इत्यादी सुविधा मोफत पुरविल्या जाणार आहेत. तसेच विद्यार्थ्यांना सदर शाळांमधील अन्य प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसमवेत एकत्रितपणे शिक्षण दिले जाणार आहे. तसेच सदर शाळांमध्ये प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या १ ली ते ५ वी च्या विद्यार्थ्यांकरिता प्रवेश मंजूर झाल्यास पुढे इयत्ता बारावी पर्यंत मोफत शिक्षणाचा लाभ अनुज्ञेय राहील.असेही इतर मागास बहुजन कल्याणचे सहायक संचालक श्रीमती मनिषा फुले यांनी कळविले आहे.



# ऋणानुबंध २२ वर्षांचा कौटुंबिक ऋणानुबंध

**अक्कलकोट/ दैनिक यशसिद्धी न्यूज**

काँग्रेसच्या दक्षिण मुंबईच्या अध्यक्ष महाराष्ट्राचे मा. सामाजिक न्याय मंत्री केंद्रिय कायम निमंत्रित सदस्य ( काँग्रेस पार्टी) प्रदेश कार्याध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश ( काँग्रेस) राज्यसभेचे खासदार आयु. चंद्रकांतजी हांडोरे यांच्या कन्या प्रज्योतीताई चंद्रकांत हांडोरे यांनी सहकुटुंब प्रा . राहूल रूही व भीमशक्तीचे तालुका अध्यक्ष दिनेश रुही यांच्या घरी कौटुंबिक भेट घेतली रेवण रूही यांच्या माध्यमातुन गेल्या २२ वर्षापासून हांडोरे साहेब व कुटुंबीय यांच्या समवेत ऋणानुबंध कायम आहेत यावेळी भीमशक्ती सामाजिक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते

# एकात्मिक कापुस, सोयाबीन व इतर तेलबिया उत्पादकता वाढ व मुल्यसाखळी विकासयोजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**सोलापूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

कापूस, सोयाबीन व इतर तेलबिया आधारित पीक पद्धतीस चालना देऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करुन कापूस, सोयाबीन व इतर तेलबिया पिकातील मूल्यसाखळीस चालना देण्यासाठी राज्य शासन तीन वर्षांसाठी विशेष कृती योजना राबवित आहे. एकात्मिक कापूस सोयाबीन आणि इतर तेलबिया उत्पादकता वाढ व मूल्यसाखळी विकासासाठी राज्य पुरस्कृत विशेष कृती योजनेचा लाभ घेण्यासाठी महाडीबीटी पोर्टलद्वारे अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तात्रय गावसाने यांनी केले आहे.

ही विशेष कृती योजना सन २०२२-२३ ते २०२४-२५ या तीन वर्षात राबविण्यात येत आहे. सन २०२४-२५ मध्ये योजनेंतर्गत चालू खरीप हंगामामध्ये पुढील निविष्ठा पुरविण्यात येणार आहेत. नॅनो युरिया सोयाबीन, नॅनो डीएपी सोयाबीन, नॅनो युरिया कापूस, नॅनो डीएपी कापूस यासाठी ३० जूनपर्यंत अर्ज करावेत तर मेटाल्डीहाइड सोयाबीनसाठी २३ जून, २०२४ पर्यंत महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करावेत. या निविष्ठांचा पुरवठा करण्याकरिता लाभार्थ्यांची निवड महाडीबीटी पोर्टलवर केलेल्या ऑनलाईन अर्जातून करण्यात येणार आहे. त्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर सदर बाबींच्या टाईल्स उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. बियाणे, औषधे व खते या टाईल्स अंतर्गत शेतकऱ्यांना अर्ज करता येतील. जिल्ह्यातील जास्तीत-जास्त शेतकरी बांधवांनी mahadbt.maharashtra,gov,in,farmer login या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावेत व योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहनही जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तात्रय गावसाने यांनी केले आहे.

# खरीप-२०२४ साठी पीक विमा भरण्यास सुरुवात, एक रुपयात भरला जाणार पीकविमा : कृषिमंत्री धनंजय मुंडे

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**



प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत महाराष्ट्रात खरीप हंगाम - २०२४ साठी पीक विमा भरण्याची सुरुवात आजपासून शासनाच्या https://www.pmfby.gov.in या संकेतस्थळाद्वारे करण्यात आली असून, याही वर्षी शेतकऱ्यांना आपल्या अधिसूचित पिकांचा विमा भरण्यासाठी केवळ एक रुपया भरावा लागणार असल्याची माहिती कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली.प्रधानमंत्री पीक विमा योजनेतून मागील वर्षी विक्रमी १ कोटी ७० लक्ष पेक्षा अधिक शेतकऱ्यांनी आपला पीकविमा भरून या योजनेत सहभाग घेतला होता. शेतकऱ्यांनी आपला खरीपाचा पीकविमा १५ जुलै पूर्वी भरून घ्यावा

खरीप २०२४ साठी भात, ज्वारी, सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद, मका, बाजरी, नाचणी, भुईमूग, तीळ, कारळे, कांदा ही १४ पिके विमा योजनेत समाविष्ट करण्यात आली आहेत. तर या पिकांचा विमा भरण्याची अंतिम मुदत १५ जुलै असून, त्यापूर्वी शेतकऱ्यांनी आपल्या पिकांचा विमा भरून घ्यावा, असे आवाहन कृषिमंत्री श्री. मुंडे यांनी केले आहे.

योजनेतील वैशिष्ट : विमा योजनेत समाविष्ट पिके भात(धान), खरीप ज्वारी, बाजरी, नाचणी (रागी), मका, तूर, मुग, उडीद, सोयाबीन, भुईमुग, तीळ, कारळे, कापूस व कांदा या १४ पिकांसाठी, अधिसूचित क्षेत्रातील शेतकऱ्यांना भाग घेता येईल. अधिसूचित क्षेत्रात, अधिसूचित पिके घेणारे (कूळाने अगर भाडेपट्टीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांसह) सर्व शेतकरी या योजनेत भाग घेण्यास पात्र आहेत. पीक कर्ज घेणाऱ्या आणि बिगर कर्जदार शेतकऱ्यांना योजनेतील सहभाग ऐच्छिक राहील, भाडेपट्टीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना पिक विमा पोर्टलवर नोंदणीकृत भाडे करार अपलोड करणे आवश्यक आहे.

ई-पीक पाहणी :- शेतकऱ्याने लागवड केलेल्या पिकाची नोंद ई-पीक पाहणी मध्ये करावी. आपल्या मालकीच्या नसलेल्या जमिनीवर विमा काढणे, उदाहरणार्थ शासकीय जमीन, अकृषक जमीन, कंपनी, संस्था, मंदिर, मस्जिद यांच्या जमिनीवर विमा काढल्यास त्याची गंभीर दखल घेतली जाईल.

या योजनेत आपण जे पीक शेतात लावले आहे त्याचाच विमा घ्यावा. शेतात विमा घेतलेले पीक नसेल तर आपणास विमा नुकसान भरपाई पासून वंचित राहावे लागेल. यावर्षी भात, कापूस, सोयाबीन पिकांमध्ये महसूल मंडल मधील पिकाचे सरासरी उत्पादन नोंदवताना रीमोट सेसिंग तंत्रज्ञानाचा वापर करून येणाऱ्या उत्पादनास ४० टक्के भारांकन आणि पीक कापणी प्रयोगाद्वारे आलेल्या उत्पादनास ६०% भारांकन देऊन मंडळाचे सरासरी उत्पादन निश्र्चित केले जाणार आहे. अर्ज करण्यासाठी आधार क्रमांक आवश्यक आहे, पिक विम्यातील अर्ज हा आधार वरील नावाप्रमाणेच असावा, पिक विम्यातील नुकसान भरपाई ही केंद्र शासनाच्या विमा पोर्टलद्वारे आधार संलग्न बँक खात्यामध्ये करण्यात येते. यासाठी आपले बँक खाते आधार संलग्न पेमेंट मिळण्यासाठी अधिकृत असणे आवश्यक आहे. याकरिता आपले बँक मॅनेजर माहिती देऊ शकतात, आधार कार्डवरील नाव व बँक खात्यावरील नाव सारखे असावे, विमा अर्ज भरण्यासाठी प्रति शेतकरी सीएससी विभागास रुपये ४० मानधन केंद्र शासनाने निर्धारित करून दिलेले आहे. ते संबंधित विमा कंपनी मार्फत सीएससी विभागास दिले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांनी प्रति अर्ज एक रुपया प्रमाणे रक्कम सीएससी चालकांना देणे अभिप्रेत आहे.

विमा संरक्षणाच्या बाबी पुढीलप्रमाणे आहेत : पिक पेरणीपासून काढणी पर्यंतच्या कालावधीत पिकांच्या उत्पादनात येणारी घट, पिक पेरणीपूर्व /लावणीपूर्व नुकसान, हंगामातील प्रतिकूल परिस्थितीमुळे नुकसान, काढणी पश्र्चात पिकाचे नुकसान, स्थानिक नैसर्गिक आपत्ती मुळे नुकसान.

विमा योजनेत सहभागी होण्याकरिता शेतकऱ्याने काय करावे?

अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकासाठी पिक कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांस देखील या विमा योजनेत सहभाग बंधनकारक नाही. मात्र त्यासाठी शेतकऱ्याने विमा योजना भाग घेण्याच्या अंतिम दिनांक आधी किमान ७ दिवस संबंधित बँकेस विमा हप्ता न भरणे बाबत लेखी कळवणे गरजेचे आहे. इतर बिगर कर्जदार शेतकऱ्याने आपला ७/१२ चा उतारा, बँक पासबुक, आधार कार्ड व पिक पेरणीचे स्वयं घोषणापत्र घेऊन प्राधिकृत बँकेत किंवा कॉमन सर्विस सेंटर (CSC) च्या मदतीने आपण विमा योजनेत सहभाग घेऊ शकता किंवा www.pmfby.gov.in या पोर्टलचे सहाय्य घेऊ शकता. योजनेत सहभागासाठी अंतिम मुदत १५ जुलै २०२४ आहे. सर्वसाधारण पीकनिहाय विमा संरक्षित रक्कम, यात जिल्हानिहाय फरक संभवतो. भात पिकासाठी विमा संरक्षित रक्कम हेक्टरी रु.४०००० ते ५१७६०, ज्वारी रु.२०००० ते ३२५००, बाजरी रु १८,००० ते ३३,९१३, नाचणी रु. १३७५० ते २००००, मका रु ६००० ते ३५५९८, तूर रु २५००० ते ३६८०२, मुग २०००० ते २५८१७, उडीद रु. २०००० ते २६०२५, भुईमुग रु. २९००० ते ४२९७१, सोयाबीन रु. ३१२५० ते ५७२६७, तीळ रु. २२००० ते २५०००, कारळे रु. १३७५०, कापूस रु. २३००० ते ५९९८३, कांदा रु. ४६००० ते ८१४२२. या योजनेच्या अधिक माहितीसाठी केंद्र शासनाचे कृषि रक्षक पोर्टल हेल्पलाईन १४४४७, संबंधित विमा कंपनी, स्थानिक कृषी विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा.

# कबड्डीला प्रोत्साहन देण्यासाठी निधी उपलब्ध करणार : उपमुख्यमंत्री अजित पवार

**मुंबई/दैनिक यशसिद्धी न्यूज**

राष्ट्रीय क्रीडा संहितेचे राज्य कबड्डी असोसिएशन कार्यकारिणीने काटेकोरपणे पालन करावे व त्यानुसार राज्यस्तरीय निवडणूक पार पाडावी. तसेच कोणत्याही खेळाडूवर अन्याय होणार नाही याची काळजी घ्या, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष अजित पवार यांनी दिल्या. कबड्डी खेळाला प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देणार असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन सल्लागार समिती व कार्यकारिणीच्या बैठकीचे आज दादर शिवाजी पार्क येथील कबड्डीमहर्षी स्व. शंकरराव साळवी सभागृहात महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजन करण्यात आले होते. यावेळी असोसिएशनचे सर्वश्री उपाध्यक्ष, आमदार भाई जगताप, माजी आमदार अमरसिंह पंडित, दिनकर पाटील, रा. उपाध्यक्षा शकुंतला खटावकर, सरकार्यवाह बाबुराव चांदेरे, खजिनदार मंगल पांडे, सहकार्यवाह रविंद्र देसाई, असोसिएशनचे आजीव सदस्य तथा उपमुख्यमंत्र्यांचे खासगी सचिव अविनाश सोलवट यांच्यासह कार्यकारिणी सदस्य आणि असोसिएशनचे सदस्य उपस्थित होते.उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, कबड्डी खेळाला प्रोत्साहन



देण्यासाठी बक्षिसांच्या रकमा वाढविण्यात आल्या आहेत. खेळांना महत्व प्राप्त व्हावे यासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही. ग्रामीण भागात कबड्डी जास्त रूजली आणि वाढली असल्याने आमदार निधी, जिल्हा नियोजन समितीमधून निधी उपलब्ध करून दिला जातो. कबड्डी खेळाला सुवर्ण दिवस आणण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. राष्ट्रीय संहितेनुसार कार्यकारिणी निवडणूक घेण्यात यावी. स्पोर्ट्स कोडचे पालन करण्यात यावे. २१ जून रोजी नव्याने होणाऱ्या कार्यकारिणीसाठी निवडणूक होणार असून, १९ जून ही जिल्हानिहाय मतदारांची नावे स्वीकारण्याची अंतिम तारीख असल्याचेही त्यांनी सांगितले.

# इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयाच्या अधिनस्त शासकीय वसतिगृहात प्रवेश सुरु

**सोलापूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत जिल्ह्यामध्ये इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयाच्या अधिनस्त मुलांचे १ व मुलींचे १ अशी दोन शासकीय वसतिगृह कार्यान्वित.करण्यात आली आहेत. वसतिगृहात सन २०२४-२५ या वर्षाकरीता प्रवेश प्रक्रिया ही ऑफलाईन पध्दतीने असून गरजू विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह ३ बी/१, अ/३२, राघवेद्र नगर, सुर्या हॉटेल जवळ, राघवेंद्र स्वामी मठाच्या पाठीमागे मुरारजी पेठ, सोलापूर येथे प्रवेशासाठी प्रवेश अर्ज सादर करावेत असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याणचे सहायक संचालक श्रीमती मनिषा फुले यांनी केले आहे.

मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृहांमध्ये विजाभज, विमाप्र, इमाव, अनाथ व दिव्यांग या प्रवर्गातील विद्यार्थी व विद्यार्थीनींना सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ७० टक्के जागा व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना ३० टक्के जागेवर विद्यार्थ्यांना विनामूल्य प्रवेश देण्याची प्रक्रिया सुरु आहे. सदर वसतिगृहामध्ये विद्यार्थी व विद्यार्थीनींना मोफत निवासाची सोय केली जाणार असून, विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर शासनाकडून थेट निर्वाह भत्ता अनुदान वितरीत केले जाणार आहे.

सदर वसतिगृहांची प्रति वसतिगृह १०० एवढी विद्यार्थी क्षमता आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी ३ बी/१, अ/३२, राघवेद्र नगर, सुर्या हॉटेल जवळ, राघवेंद्र स्वामी मठाच्या पाठीमागे मुरारजी पेठ, सोलापूर येथे संपर्क साधावा असे आवाहनही आवाहन इतर मागास बहुजन कल्याणचे सहायक संचालक श्रीमती मनिषा फुले यांनी केले आहे.